मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 29 एप्रिल 2024 | पान- 1


# मतदारांसाठी 'नो युवर पोलिंग स्टेशन'

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची सर्व क्षेत्रीय कार्यालयात सुविधा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये मतदारांच्या सोयीसाठी 1 ते 13 मे या कालावधीत 'नो युवर पोलिंग स्टेशन' (मतदान केंद्राविषयी जाणून घ्या) कक्ष सुविधेद्वारे मतदारांना मतदानाच्या अनुषंगाने मतदान केंद्राची माहिती देण्यात येणार आहे; या सुविधेचा शहरातील अधिकाधिक मतदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.




लोकसभा निवडणुकीसाठी अनेक जण पहिल्यांदाच मतदान करत आहेत. त्यामुळे त्यांच्यात अभूतपूर्व उत्साह आहे. तुमचे मतदान केंद्र कोणते आहे हे अनेकदा लक्षात येत नाही. उत्साहाच्या भरात आपण भलत्याच केंद्रावर जातो. तेव्हा या पद्धतीने तुमचे मतदान केंद्र हुडकता येते.

येत्या 13 मे रोजी होणाऱ्या मतदानाचा टक्का वाढविण्याच्याअनुषंगाने या कक्षाची 1 मे पासून स्थापना करण्यात येणार आहे. सुट्टीच्या दिवशीही कक्ष सुरु राहणार असून या कक्षाद्वारे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे. या संधीचा मतदारांनी लाभ घ्यावा व येत्या मतदानाच्यावेळी अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.

ॲपच्या माध्यमातून माहिती करुन घ्या मतदान केंद्र सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधेसाठी निवडणूक आयोगाने हे मोबाईल ॲप तयार केले आहे. हे मोबाईल ॲप अँड्राईड आणि आयओएस या दोन्ही युझर्ससाठी उपलब्ध आहे. मो ॲप उघडताच तुम्हाला स्किप हा पर्याय दिसेल. त्यावर तुम्ही क्लिक केल्यावर या ॲपवर तुम्हाला सर्व पर्याय दिसतील. तुमचे जवळचे मतदान केंद्र ओळखण्यासाठी ॲपमध्ये सर्वात वरील भागातील वर क्लिक करा.

### कार्यालयनिहाय क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती

**» या कक्षासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आहे. सुचेता पानसरे यांची 'अ' क्षेत्रीय कार्यालय, निगडी प्राधिकरण, अमर पंडीत 'ब' क्षेत्रीय कार्यालय, चिंचवड, अण्णा बोदडे, 'क' क्षेत्रीय कार्यालय, भोसरी, अंकुश जाधव, 'ड' क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी, राजेश आगळे, 'ई' क्षेत्रीय कार्यालय, भोसरी, सिताराम बहुरे, 'फ' क्षेत्रीय कार्यालय, निगडी, अजिंक्य येळे, 'ग' क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव आणि उमेश ढाकणे, 'ह' क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी याप्रमाणे नियुक्त्या करण्यात आल्या आहेत**

# आंदोलनाचा इशारा मिळताच कामाला सुरुवात

## सतत खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्या बाबत नागरिकांना दिलासा मिळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाची काहीली होत असताना, सातत्याने वीजपुरवठा खंडीत होत असल्याने नागरिक हैराण झाले होते. येत्या आठ दिवसांत याबाबत कायमस्वरूपी तोडगा न काढल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. आंदोलनाचा इशारा देताच महावितरणच्या अधिकारी खडबडून जागे झाले अन् कामाला सुरुवात झाली.

चिखली आणि मोई या दोन्ही गावांना एकाच वीज वाहिनीद्वारे वीज पुरवठा केला जातो. मात्र, मोई परिसरातील खाणीत शेकडो क्रशर आहेत. त्याने, चिखली परिसरातील वीज पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात ताण येऊन वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याची ग्रामस्थांकडून तक्रारी करण्यात आल्या आहेत. एकदा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत करण्यासाठी दोन ते तीन तासांचा कालावधी लागत आहे. रात्री-अपरात्री कधीही वीजपुरवठा खंडित होत असल्याने आणि सध्या उष्णता वाढल्याने नागरिक उकाड्याने अक्षरशः हैराण होत आहेत. त्याचबरोबर चिखली परिसरात शेकडो लघुउद्योग आहेत. खंडित




वीज पुरवठ्यामुळे लघुउद्योगांचे कामकाज बंद पडत आहे. या परिसरातील लघु उद्योगांमध्ये हजारो कामगार काम करत असून त्यांना बसून पगार देण्याची वेळ लघुउद्योजकांवर येत असल्याने लघुउद्योजक देखील आर्थिक संकटात सापडले आहेत.

या सर्व परिस्थितीवर ग्रामस्थांनी तसेच परिसरातील युवा नेत्यांनी महावितरणच्या विरोधात आंदोलन अन् मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. त्यावर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी खडबडून जागे होत, कामाला सुरुवात केली आहे.

**"चिखली गावातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याबद्दल ग्रामस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे, चिखली गावासाठी वेगळी केबल टाकण्याची काम हाती घेण्यात आले आहे. ते लवकरच पूर्ण करण्यात येईल.**

**- अतुल देवकर, कार्यकारी अभियंता, भोसरी विभाग, महावितरण.**

**"ऐन कडक उन्हाळ्यात सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याने उकाड्याने अबालवृध्द हैराण झाले आहेत. अनेक लघुउद्योजकांचे नुकसान होते आहे. याला कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून कामकाज लवकर सुरु करण्यासाठी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. आठ दिवसांत काम पूर्ण न झाल्यास मोर्चा अथवा आंदोलन करू असे सांगण्यात आले होते. त्यावर कामकाजाला सुरुवात झाली आहे.**

**- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते.**

# भोसरी मतदारसंघ 'किंगमेकर'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला विश्वास



> देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात झालेला विकास, शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय, कल्याणकारी योजना आणि देशाची जागतिक पातळीवर उंचावलेली प्रतिक्षा यामुळे महायुतीला निश्चितपणे मोठा जनाधार आहे. भोसरी मतदार संघातील सुमारे ५ लाख ३५ हजाराहून अधिक असलेले मतदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना निवडून देतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

**पुणे | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघात महायुतीची ताकद निर्णायक असून, गत निवडणुकीत या मतदार संघातून सुमारे ३७ हजार मतांचे लीड आढळराव पाटलांना मिळाले होते. आता त्याची पुनरावृत्ती होणार असून, यावेळी १ लाख मातांची आघाडी या मतदार संघातून राहील आणि शिरुर लोकसभा मतदार संघात भोसरी 'किंगमेकर'च्या भूमिकेत असेल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

शिरुर लोकसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय- मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ भोसरी गावठाण येथे दौरा करण्यात आला. यावेळी पदयात्रेची सुरूवात भोसरीचे ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरात दर्शन घेऊन करण्यात आली. त्यानंतर श्री हनुमान मंदिर येथे भेट दिली. पदाधिकाऱ्यांनी वाजत गाजत फटाक्याच्या आतिषबाजीत आढळराव पाटील यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, भोसरी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. परिसरात पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आमदार महेश लांडगे यांच्यासह महायुती व घटक पक्षांचे मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिसरातील महिला-माता-भगिनींनी उमेदवार आढळराव पाटील यांचे ठिकठिकाणी औक्षण केले. भोसरी विधानसभा मतदार संघातून १ लाख मतांची आघाडी देण्याचा निर्धार श्री. भैरवनाथ मंदिरात करण्यात आला. तसेच, "बलशाली भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांना साथ द्या..." असे आवाहन यानिमित्ताने मतदार, नागरिकांना करण्यात आले.

शिरुर शहर व पंचक्रोशीने शिवाजीराव आढळराव पाटील यांना चांगले मताधिक्य दिले असुन शिरुर शहरासाठी भरघोस निधी आढळराव यांनी उपलब्ध करुन दिला असुन पदयात्रेला मिळालेला प्रतिसाद पाहता या वेळेस सुध्दा शिवाजीराव आढळराव पाटील मोठे मताधिक्य शिरुर शहर व पंचक्रोशीतुन मिळेल असा विश्वास कल्पनाताई आढळराव पाटील यांनी व्यक्त केला .

शिरुर लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांच्या प्रचारार्थ आढळराव यांच्या पत्नी कल्पना आढळराव पाटील यांनी शिरुर शहरातून पदयात्रा काढत शिरुरकरांशी संवाद साधला. पदयात्रेला शहरात चांगला प्रसिसाद मिळाला . पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाच्या लोकसभा मतदारसंघापैकी एक असलेल्या शिरुरमध्ये यंदा काय निकाल लागणार, याकडे सध्या अवघ्या राजकीय वर्तुळाचे लागले आहे.

# मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी पुणेकरांची मोहीम

## पेट्रोल डिलर्स असोसिएशन : मतदान करा अन् 50 रुपयांचे पेट्रोल मोफत मिळवा



### काय आहे योजना

» पुण्यातील पेट्रोल डिलर्स असोसिएशनने महा एनजीओ फेडरेशन आणि इतर स्वयंसेवी संस्थांना सोबत घेतले आहे. या संस्थांसोबत 'व्होट कर पुणेकर' मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार मतदान करुन आल्यानंतर बोटावरील शाई दाखवली आणि एक लिटर ऑईल खरेदी केले तर त्यांना ५० रुपयांचे पेट्रोल मोफत मिळणार आहे. पुणे लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर २० मेपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे, अशी माहिती पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशन फक्त मोफत पेट्रोल देऊन थांबणार नाही. तर घरोघरी जाऊन जनजागृती करणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठीही मदत करणार आहे. मतदानाच्या दिवशी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना मदत करणार आहे.

देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. मतदानाचे दोन टप्पे पूर्ण झाले आहेत. या दोन्ही टप्प्यात विदर्भातील मतदारांनी उत्साह दाखवला नाही. विदर्भात यंदा २०१९ पेक्षा कमी मतदान झाले. या कमी मतदानाचा फटका कोणाला बसणार? याचा निर्णय ४ जून रोजी होणार आहे. परंतु पुणेकरांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहे. नागरिकांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडल्यास त्यांना ५० रुपयांचे पेट्रोल मोफत देण्यात येणार आहे. 'व्होट कर पुणेकर' या मोहिमेअंतर्गत मतदान करुन एक लिटर ऑईल खरेदी करणाऱ्यास ५० रुपयांचे पेट्रोल मोफत देण्यात येणार आहे. पुणे पेट्रोल डिलर्स असोसिएशने ही मोहीम सुरु केली आहे.

पेट्रोल डिलर्स असोसिएशन फक्त मोफत पेट्रोल देऊन थांबणार नाही. तर घरोघरी जाऊन जनजागृती करणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यासाठीही मदत करणार आहे. मतदानाच्या दिवशी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना मदत करणार आहे. या पोलीस कर्मचाऱ्यांना २० हजार पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने मतदान केंद्र शोधण्यासाठी HTTPS://ELECTORALSEARCH.IN या वेबसाईटवर माहिती उपलब्ध करुन दिली आहे. देशभरातील मतदान केंद्राची माहिती त्यावर आहे. 'व्होट कर पुणेकर' या मोहिमे अंतर्गत आणखी एक सुविधा दिली आहे.HTTP://WWW.VOTEKARPUNEKAR.COM हे संकेतस्थळ सुरू केले आहे. त्यावर पुणेकर मतदार केंद्र शोधू शकतील. क्यूआर कोड स्कॅन करूनही मतदान केंद्राचा शोध घेता येणार आहे.

# खोके घेणाऱ्यांना घरी बसवा:खा.चतुर्वेदी

## "डायलॉग ऑन डेव्हलपमेंट अँड डेमोक्रसी"तून साधला आयटीयन्ससोबत संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदारांनी संधी दिल्यानंतर मतदारसंघासाठी मिळणारा संसद निधी देखील पूर्णपणे खर्च करू शकत नाहीत. ते त्यांचे अपयश आहे. मतदारांचा आवाज उठविण्याऐवजी स्वतःसाठी खोके घेऊन गप्प बसले. त्यांना या निवडणुकीत घरी बसवा. रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधांवर तुमचा आवाज बनतील आणि तुमच्या सगळ्या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी तुमच्या सोबत राहतील ते महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना मावळ लोकसभा मतदारसंघातून संसदेत पाठवा, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या तथा खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी केले.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ इंडिया आघाडीच्या वतीने वाकड येथे शनिवारी, (२७ एप्रिल) आयोजित डायलॉग ऑन डेव्हलपमेंट अँड डेमोक्रसी कार्यक्रमातून त्यांनी आयटीयन्ससोबत संवाद साधला. त्यावेळी त्या बोलत होत्या. या प्रसंगी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील, आम आदमी पार्टी महाराष्ट्राचे कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील, मावळ लोकसभेचे प्रचारप्रमुख योगेश बाबर, शिवसेना महिला शहर संघटिका अनिता तुतारे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शहराध्यक्ष तुषार कामठे, आआम आदमी पार्टीचे महाराष्ट्र पदवीधर अध्यक्ष चेतन बेंद्रे, शहराध्यक्ष मीना जावळे, शिवसेनेचे विभागप्रमुख मचिंद्र देशमुख आदी उपस्थित होते.

खासदार प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या की, देशात नामांकित आयटी कंपन्यांमध्ये नव्याने रोजगारनिर्मिती होत नाही. जे आहेत त्यांचा रोजगार कमी केला जातो. देशात प्रथमच आयआयटीतून बाहेर पडणाऱ्यांना नोकरी मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली. परंतु, सरकारला याचा जाब विचारण्याची आवश्यकता आहे. ज्यांना निवडून देतो, ते जाब विचारणे सोडून सार्थासाठी गप्प बसतात. देशातील प्रत्येक वर्ग सरकारवर नाराज आहे. जगातील सर्वात जास्त श्रीमंत पार्टी जर भाजप असेल, तर कुठेतरी भ्रष्टाचार होत असल्याचे अधोरेखित होते. नोकरदार, कामगार वर्गाच्या संघर्षात शिवसेना कायम उभी राहिली. रोजगार गेल्याच्या वेदना जाणाणारा विचार आपला आहे. आयटी वर्गाला येणा-या अडचणींसाठी त्यांच्यासोबत आम्ही राहू. तसेच, महिलांची रा जकारणातील भागिदारी वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. इंडिया आघाडीने नोकरीत महिलांना सामावून घेण्याची भूमिका घेतलेली असल्याचेही चतुर्वेदी यांनी आवर्जून सांगितले.




### संविधान राहील की नाही, हे ठरविणारी निवडणूक : खासदार प्रियंका चतुर्वेदी

» आपलं संविधान प्रगतिशील आहे. ते संविधान बदलाची भाषा आज भाजपचे लोक करतात. त्यामुळे ही निवडणूक केवळ आपल्या दैनंदिन प्रश्नापुरती राहिलेली नाही. तर संविधान, लोकशाही आणि आपला आवाज उचलण्याचा मौलिक अधिकार पुढे कायम राहणार की नाही, हे ठरविणारी ही निवडणूक असणार आहे. यासोबत सद्यवादी विचारांचा आपल्यावर पगडा आहे. हिंदू असल्याचा सर्वांना गर्व आहे. देशातील दुफळीमुळे इतिहासात कायम आपला पराभव झाला. या निवडणुकीच देशाला सर्वोच्च स्थानी ठेवून मतदान करा, असेही आवाहनही खा. चतुर्वेदी यांनी केले.

### संजोग वाघेरे यांनी आयटीयन्ससमोर मांडले व्हिजन...

» नगरसेवक, महापौर म्हणून काम केले. त्यामुळे शहर पातळीवर भेडसावणारे प्रश्न मार्गी लावण्यासाठी तुमच्यासोबत मी आहे. सोसायट्यांमध्ये भेडसावणारा पाणीप्रश्न बिकट झालेला आहे. कारण, मागच्या काळात शहरात त्याचे नियोजन झाले नाही. स्मार्ट सिटी व पाणी योजनांच्या घोषणा करून ते होत नसते. त्यासाठी लोकप्रतिनिधी या नात्याने समन्वय घडवून, मध्यमार्ग काढून नियोजनाची आवश्यकता असते. ते करून शहरी भागातील पाणीप्रश्नावर, वाहतूक कोंडीवर प्राधान्याने काम करू. यासह मतदारसंघातील गडकिल्ले, निसर्गरम्य, प्रेक्षणीय स्थळे विकसित करून पर्यटनाला चालना दिली जाईल. प्रामुख्याने मतदारसंघात उद्योग कसे वाढतील, त्यातून रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न केला जाईल. तुमच्यासोबत सातत्याने संवाद साधून तुमचे मुद्दे संसदेत मांडण्याचे काम जबाबदारीने करू, अशा शब्दात संजोग वाघेरे पाटील यांनी आयटीयन्सला आश्वस्त केले.

# जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर टँकरचा भीषण अपघात

## केबिनमध्ये अडकलेल्या चालकाची अग्निशमन दलाकडून सुखरूप सुटका

**पिंपरी | प्रतिनिधी**

जुना पुणे मुंबई महामार्गावर मोरवाडी येथे एका टँकरचा भीषण अपघात झाला. या अपघातात चालक जखमी झाला आहे. केबिनमध्ये अडकलेल्या चालकाची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. ही घटना पहाटे अडीच वाजताच्या सुमारास घडली.

अंकुश मस्के (वय 46) असे जखमी चालकाचे नाव आहे.याबाबत माहिती अशी की, अंकुश मस्के हे त्यांच्या ताब्यातील टँकर (एमएच 43/ सीई 0784) जुन्या पुणे मुंबई महामार्गावरून घेऊन जात होते. मोरवाडी येथे आल्यानंतर त्यांच्या टँकरला भीषण अपघात झाला. या अपघातात अंकुश मस्के हे केबिन आणि स्टेअरिंगच्या मध्ये अडकले. अपघाताची माहिती मिळताच पिंपरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

त्यानंतर मस्के यांना रुग्णवाहिकेतून वायसीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.

या अपघातात टँकर मधील ऑइल रस्त्यावर सांडले. यामुळे वाहने घसरून अपघाताची शक्यता निर्माण झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्त्यावर सांडलेल्या ऑइलवर माती टाकून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.



### चालकाची अग्निशमन दलाच्या जवानांकडून सुटका

» अडकलेल्या चालकाला बाहेर काढण्यासाठी पिंपरी पोलिसांनी अग्निशमन विभागाला पाचारण केले. त्यानुसार पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र आणि प्राधिकरण उपअग्निशमन केंद्रातील लीडिंग फायरमन विकास नाईक, प्रतीक कांबळे, अमोल चिपळूणकर, अर्जुन जाधव, अभिषेक भांगे, श्री कुटे, श्री कंठाळे आणि इतर कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी त्वरित सर्कुलर सॉ, स्प्रेडर, क्रोबार, रोप, रेस्क्यू बेल्ट इत्यादीच्या सहाय्याने अंकुश मस्के यांची सुखरूप सुटका केली.

# ‘लॉजिस्टिक पार्क’च्या भूमीपूजनाची घोषणा

## चाकण हे औद्योगिक आणि लॉजिस्टिक ऑपरेशन्ससाठी एक आदर्श ठिकाण

**पुणे | प्रतिनिधी**

ब्लॅकस्टोन रिअल इस्टेट फंडांच्या मालकीच्या भारतातील ग्रेड ए लॉजिस्टिक पार्कचा भाग असलेला होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सने पुणे, चाकण पाचव्या प्लॅन्स येथील आपल्या दुसऱ्या इंडस्ट्रियल आणि लॉजिस्टिक पार्कच्या भूमीपूजनाची घोषणा केली आहे. हे १०० एकरचे पार्क सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधांनी युक्त, देशातील उत्तम प्रकारे विकसित अशा प्रमुख औद्योगिक केंद्रांपैकी एक असणाऱ्या चाकण येथे आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाद्वारे (एक्स्प्रेस वे) मुंबई व पुण्याशी तसेच जेएनपीटी बंदराशी जवळीक असल्यामुळे चाकण हे औद्योगिक आणि लॉजिस्टिक ऑपरेशन्ससाठी एक आदर्श ठिकाण ठरते.

होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सने नुकतेच ५२ एकर चाकण दुसऱ्या उद्यानाचा विकास पूर्ण केला आहे. हे पार्क विविध क्षेत्रांतील अनेक नामवंत कंपन्यांचे तळ आहे. यात वाहनाचे सुटे भाग, अभियांत्रिकी आणि थर्ड पार्टी लॉजिस्टिक सेवा प्रदात्यांचा समावेश आहे.



ब्लॅकस्टोनचे प्रिंसिपल उर्विश रांभिया म्हणाले, “चाकण पाचव्या प्लॅन्स येथे भूमिपूजन करताना आम्हाला आनंद होत आहे. मोक्याच्या ठिकाणी उच्च दर्जाची लॉजिस्टिक मालमत्ता प्रदान करण्याच्या आमच्या कटिबद्धतेचा एक भाग म्हणून अत्याधुनिक सुविधेच्या स्वरूपात हिचे बांधकाम केले जाईल. ई-कॉमर्सचा वापर वाढल्याने आणि भरघोस औद्योगिक वाढीमुळे आम्हाला भारतात आधुनिक वेअरहाऊसिंग मागणी जोरात असल्याचे दिसून येत आहे.”

ब्लॅकस्टोन ही जागतिक स्तरावर वेअरहाऊसिंग आणि लॉजिस्टिक स्पेसची सर्वात मोठी मालक असून तिने लॉजिस्टिक्स विभागात ५५ अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. जागतिक पातळीवर तिच्याकडे ५७५ दशलक्ष चौरस फुटांपेक्षा जास्त वेअरहाउसिंग स्पेसची मालकी आहे. भारतात ब्लॅकस्टोन ही सर्वात मोठ्या विदेशी गुंतवणूकदारांपैकी एक असून तिच्याकडे ५० अब्ज डॉलरच्या मालमत्तांचे व्यवस्थापन आहे.

ब्लॅकस्टोन ही भारतातील सर्वात मोठी व्यावसायिक रिअल इस्टेट मालक असून किरकोळ विक्री, वेअरहाउसिंग आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात ती सर्वात मोठी आहे. वेअरहाऊसिंग क्षेत्रात ब्लॅकस्टोनने होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स पोर्टफोलिओच्या उभारणीसाठी एक अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. यात ४० दशलक्ष चौरस फूट वेअरहाऊसिंग आणि लॉजिस्टिक स्पेसचा समावेश आहे.

भारतातील आपला लॉजिस्टिक पोर्टफोलिओ सध्याच्या 40 दशलक्ष चौरस फूटावरून २.५ पटीने वाढवून १०० दशलक्ष चौरस फूट करण्याची ब्लॅकस्टोनची योजना आहे. सध्याचे आपले संयुक्त उद्यम (जेव्ही) आणि भागीदारीच्या माध्यमातून तसेच येत्या तीन ते पाच वर्षांत नवीन भागीदारींवर लक्ष केंद्रीत करून हे साध्य करण्यात येईल.

### होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सबद्दल...

» होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स हा ब्लॅकस्टोन रिअल इस्टेट फंडांच्या मालकीचा भारतातील लॉजिस्टिक प्लॅटफॉर्म आहे. होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स (तिच्या संलग्न कंपन्यांसह) १,७०० एकर पेक्षा जास्त आणि ४२ दशलक्ष चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेल्या २४ औद्योगिक आणि लॉजिस्टिक पार्क्सचे व्यवस्थापन करते. भारतातील १० प्रमुख बाजारपेठांमध्ये ते आहेत.

# रणरणत्या उन्हातही बारणे यांचा प्रचार उत्साहात

## पारा 42 अंशांवर असतानाही उरणमध्ये बारणे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**पुणे | प्रतिनिधी**

कडक उन्हाळ्यात तापमान 42 अंशांवर गेलेले असतानाही मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारातील उत्साह तसूभरही कमी झाला नसल्याचे पहायला मिळाले. रणरणत्या उन्हात बारणे यांनी उरण तालुक्यातील तब्बल पन्नास गावांपर्यंत जाऊन मतदारांशी संपर्क साधला.

खासदार बारणे यांनी उष्णतेच्या लाटेची पर्वा न करता उरण तालुक्याचा प्रचार दौरा केला. त्यांच्या समवेत आमदार महेश बालदी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अतुल भगत, भाजपचे तालुकाध्यक्ष रवी भोईर, शिवसेना तालुकाप्रमुख महेंद्र पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भार्गव पाटील, तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर तसेच




कौशिक शहा, जयवीन कोळी, जितेंद्र घरत, महेश कडू, शशी पाटील गोपीनाथ म्हात्रे, दीपक ठाकूर, संदेश म्हात्रे, संदेश ठाकूर, समद भोंगळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उरण तालुक्यातील मोरा येथून प्रचार फेरीला सुरुवात झाली. आमदार बंगला, गणपती चौक, करंजा, मुळेखंड, तेलीपाडा, द्रोणागिरी नोड, बोकडविरा, फुंडे, डोंगरी, पाणजे, सोनारी, करळ, जसखार, नवघर, भेंडखळ, खोपटे, कोप्रोली, पाणदिवे, पिरकोन, पाले, गोवठणे, आवरे, सारडे, वशेणी, पुनाडे, मोठीजुई, कळंबुसरे, चिरनेर, विंधणे, दिघोडे, वेश्वी, चिर्ले, शिव समर्थ संग्रहालय, जासई, गव्हाण, कोपर, शेलगर, न्हावा, नवा खाडी, डेल्टा, कोपर तला, बिकानेर सेक्टर 17, ठाकूर रेसिडेन्सी, भूमिपूजन भवन, बामण, डोंगरी गाव, सेक्टर 21 भाजप कार्यालय मार्गे करंजाडे सेक्टर 24 येथे प्रचार फेरीची सांगता झाली.

मागीलवेळी पार्थ पवार यांचा पराभव केला होता. ते प्रचाराला येतील का असे विचारले असता खासदार बारणे म्हणाले, की उमेदवार म्हणून प्रचारात सहभागी होण्यासाठी पार्थ पवार यांना सांगेन. येणाऱ्या काळात ते प्रचारात सहभागी होतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### पदाधिकारी कार्यकर्त्यांचा उत्साहही दुणावला

» रणरणत्या उन्हात उघड्या विजय रथावर उभे राहून खासदार बारणे मतदारांना नमस्कार करून व हात उंचावून अभिवादन करत होते. उन्हापासून रक्षणासाठी त्यांनी धनुष्यबाण चिन्ह असलेली भगवी टोपी परिधान केली होती. खासदार बारणे यांचा उत्साह पाहून अन्य पदाधिकारी कार्यकर्त्यांचा उत्साहही दुणावला. प्रचार फेरीच्या मार्गावर ठिकठिकाणी झाडांच्या सावलीला व आडोशाला उभे राहून लोक बारणे यांची वाट पाहत होते. फटाके वाजवून, फुलांच्या पाकळ्यांची उधळण करीत प्रत्येक गावात बारणे यांचे जंगी स्वागत करण्यात आले. प्रचार फेरीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी ग्रामस्थांकडून थंड पाणी, सरबत, ताक यांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे कार्यकर्त्यांना थोडासा थंडावा मिळत होता.